तरुण भारत संवाद
शुक्रवार दि.१४ नोव्हेंबर २०२५

# दोनशे वर्षानंतरची संधी घालवली

## कमानीतील रचना थोडी बदलल्यास विनाअडथळा होणार किरणोत्सव : अभ्यासकांचे मत

- अंबाबाई गरूड मंडप आणि किरणोत्सवातील अडथळा
- मंडपाच्या नव्याने होणाऱ्या कामात दुरूस्तीची गरज
- ५ दिवसाचा किरणोत्सव सध्या ७ दिवसांवर आला

**करवीर निवासिनी श्री अंबाबाईच्या मूळ मंदिरासमोरील असलेला गरुड मंडप उतरवल्याने त्यानंतरचे किरणोत्सव पूर्ण क्षमतेने आणि दोन दिवस जास्त झाले आहेत. त्यामुळे गरूड मंडपाचे नव्याने होत असलेले बांधकाम होण्यापूर्वी मंडपाच्या कमानीची रुंदी वाढवणे गरजेचे असल्याचे मत अभ्यासक व्यक्त करत आहेत. तब्बल २०० वर्षानंतर गरुड मंडप उतरवला आहे. आता संधी आहे तर कमानीची रचना थोडी बदलली की किरणोत्सवातील हा अडथळा कायमचा दूर होणार आहे. पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीने याचा विचार करावा, अशी मागणी होत असली तरी पुरातत्व विभागत्याला राजी होत नसल्याची चर्चा आहे.**



दीपक जाधव
कोल्हापूर

करवीर निवासिनी अंबाबाई मंदिरातील वर्षातून दोनदा होणाऱ्या किरणोत्सवात येत असलेल्या अडथळ्यांमध्ये गरुड मंडप कमानीचा देखील एक अडथळा आहे. कोणत्याही कारणाने गरुड मंडप उतरवला असला तरी आता त्यामुळे किरणोत्सव पूर्ण क्षमतेने आणि एक दिवस आधी आणि एक दिवस नंतर होत आहे. पाच दिवसांचा किरणोत्सव ७ दिवसांवर आला आहे.

फेब्रुवारीमध्ये आणि आता देखील सुरू असलेल्या किरणोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी सोमवारी प्रखर सूर्यकिरणे देवीच्या चेहऱ्यापर्यंत गेली आहेत, हा गरुड मंडप उतरवल्याचा परिणाम आहे. आता गरुड मंडपाचे नव्याने बांधकाम होत आहे. कमानीची रचना थोडीशी बदलण्याची हीच संधी आहे. कमान थोडी रुंद केली तरी हा अडथळा दूर होणार आहे, याचा देवस्थान समितीने गांभीर्याने विचार करावा, अशी मागणी अभ्यासकांनी केली आहे.

**तारखांमध्ये झाला बदल**

किरणोत्सवांच्या तारखांमध्ये काळानुरूप थोडा बदल झाला आहे. दक्षिणायन म्हणजेच नोव्हेंबरमधील किरणोत्सवाच्या तारखा दोन


तरुण भारत संवाद विशेष

दिवसांनी पुढे गेल्या आहेत. हा सोहळा ९ ते १३ नोव्हेंबरदरम्यान होत आहे. उत्तरायण किरणोत्सव २ दिवस आधी, २९ जानेवारी ते २ फेब्रुवारीदरम्यान होत आहे. मात्र या दरम्यान किरणोत्सव पूर्ण क्षमतेने होत आहे.

अडथळा ठरणारे दोन खांब उभारताना त्याचा बदल करण्यास पुरातत्व विभागाने नकार दिला आहे. श्री अंबाबाई मंदिर परिसरात उभारण्यात येत असलेल्या गरुड मंडपाच्या दोन खांबांचा गेली कित्येक वर्षे अंबाबाईच्या किरणोत्सवात अडथळा येत आहे. समोरचे हे दोन खांब फक्त एक– एक फुटाने सरकवल्यास पूर्ण क्षमतेने किरणोत्सव होऊन सात दिवसांचा किरणोत्सव सोहळा होणार आहे. पण सध्या गरूड मंडपाचे काम सुरू आहे. तोपर्यंतच त्यात बदल होणे गरजेचे आहे. तब्बल २०० वर्षांनी ही बदलाची संधी आयती चालून आली होती. मात्र पुरातत्व विभागाकडून त्यासाठी नकारघंटा वाजवली जात आहे. पण जिल्हाधिकाऱ्यांनी यात लक्ष घातले तर हा बदल होऊ शकतो. अंबाबाई मंदिरातील गरुड मंडपाचे खांब बसवले जात आहेत. अगदी समोरच्या बाजूला असलेले दोन खांब कायमच अंबाबाईच्या किरणोत्सवात अडथळा ठरायचे. मात्र दोन वर्षांपासून गरुड मंडप नसल्याने अंबाबाईचे वर्षातून दोन वेळा होणारा किरणोत्सव सात दिवस आणि प्रखर सूर्यकिरणांसह होत आहे.

> गरूड मंडपाच्या ज्या दोन खांबांचा किरणोत्सव मार्गातील अडथळा हा गेल्या कित्येक वर्षाच्या अभ्यासाअंती स्पष्ट झाला. नव्याने गरूड मंडपाची उभारणी होत असताना त्या खांबाची रूंदी महाद्वारच्या रूंदीप्रमाणे करण्यासाठी देवस्थानला कळवले होते. तसे देवस्थानने पुरातत्व विभागाला कळवले होते. मात्र त्यात बदल न करता मंडपाची उभारणी सुरू आहे.
>
> **– मिलींद कारंजकर, पदार्थविज्ञान, खगोल शास्त्र विभाग ॲडजंक्ट प्रोफेसर, विवेकानंद महाविद्यालय**

> किरणोत्सवामध्ये गरूड मंडपाच्या खांबांचा अडथळा असल्याचे काही अभ्यासक,नागरिकांनी देवस्थानला सांगितले होते. तसे देवस्थानने पुरातत्व विभागाच्या संबंधीत अधिकाऱ्यांना कळवले होते. मात्र पुरातत्व विभागाने त्यात बदल करायला स्पष्ट नकार दिला.
>
> **– शिवराज नाइकवाडे. सचिव, पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समिती**



**कामावेळीच नकार का?**

दोन खांब एक–एक फुटांनी मागे सरकवायचे होते. त्यामुळे मंडपाच्या रचनेत कोणताही बदल होणार नव्हता. मंडप उभारण्याआधी देवस्थान समितीने हा विषय पुरातत्व विभागाला कळवून खांब एक फुटाने सरकवण्यास सांगितले होते, त्यावेळी पुरातत्व विभागाने देखील त्याला होकार दिला होता. पण आता कामावेळीच नकार दिल्याचे समितीकडून समजते.